**सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना लि, अमृतनगर**

पो.संगमनेर एस. के. ४२२६०८ ता. संगमनेर, जि. अहमदनगर

Email: amrutsugar@yahoo.co.in

## शर्ती व अटी

१. साखर डिलीव्हरी घेण्यापुर्वी साखरेची संपुर्ण करासह होणारी रक्कम कारखान्याकडे जमा करील

२. मला मंजुर झालेल्या साखर पोत्याची (क्विंटल)डिलीव्हरी मी कारखाना गोडावुनमधुन घेईल

३ .टेंडर फॉर्ममध्ये नमुद केलेला भाव करविरहीत आहेत.टेडंर मंजुर झाल्यास सरकारी नियमाप्रमाणे कर भरण्याची जबाबदारी माझी राहील.

४ .साखरेची डिलीव्हरी घेतांना साखरेची पोती पाहुन घेण्याची जबाबदारी माझी राहील.साखरेची डिलीव्हरी घेतल्यानंतर मालाची संपुर्ण जबाबदारी माझी राहील.साखर कारखाना गेटचे बाहेर साखर पोती वाहनात भरुन गेलेनंतर कोणतीही सबब/तक्रार विचारात घेतेली जाणार नाही.

५. खरेदी केलेल्या मालाची डिलीव्हरी मी मुदतीत घेतली नाही तर झालेला सौदा रद्द करण्याचा अधिकार कारखान्यास राहील अशाप्रसंगी मी घेतलेली साखर बाजारभावाप्रमाणे फेर विक्री करण्याचा अधिकार कारखान्यास राहील.अशा व्यवहारात कारखान्यास होणा-या नुकसानीस मी जबाबदार राहील. व होणारे नुकसानीची रक्कम त्वरीत कारखान्यात भरणा करण्याची जबाबदारी माझी राहील.

६. करामध्ये वाढ झाल्यास वाढीव कर भरण्याची जबाबदारी सर्वस्वी माझी राहील.जर संबधीत डिपार्टमेंट कडुन कधीकाळी वाढीव कराची मागणी झाल्यास ती भरण्यास मी तयार आहे.

७. टेडंर मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार कारखान्यास राहील.

८.टेंडर सादर करणारा खरेदीदार हा जी.एस.टी.नंबर धारण करणारा अधिकृत व्यापारी असला पाहीजे.

९ साखर विक्री पोत्याची संख्या परीस्थीतीनुरुप कमी/जास्त करणे व्यवस्थापनाचा अधिकार राहील.

१०.आपल्या फर्म चे वतीने इतर व्यक्तीने टेंडर भरण्यास आपण सुचना केली असल्यास तसे अधिकार पत्र कारखान्याकडे अगोदर देऊन कारखान्याची मान्यता घ्यावी लागेल.

११. टेंडर मंजुर झाल्यानंतर (बॅक हॉलीडे सोडुन) रुपये १००/-प्र.क्विटल या प्रमाणे रक्कम त्वरीत भरणा करावी.सदरची रक्कम शेवटच्या डीलेव्हरी इनव्हाईसमध्ये समायोजीत केली जाईल.

१२.वरील शर्ती व अटी शिवाय साखर विक्री टेंडरचे परिस्थीतीनुरुप जादा अटी घालण्याचा किंवा प्रचलित अटीमध्ये /नियमांमध्ये बदल करण्याचा /रद्द करण्याचा अधिकार कारखाना व्यवस्थापनास राहील.

## कराराच्या शर्ती व अटी

१.मी टेंडर फॉर्ममधील सर्व शर्ती व अटी मान्य करुन खालील करार लिहुन देत आहे.

२ .व्यवहाराप्रमाणे खरेदी केलेल्या मालाची किंमत ठरविलेल्या दराप्रमाणे मालाची डिलेव्हरी मागणेपुर्वी व घेणेपुर्वी कारखान्यात भरील.

३. साखरेची डिलेव्हरी कारखान्याचे गोदामावर म्हणजे एक्स गोडावुन डिलेव्हरी घेईल.

४. मालाची डिलेव्हरी कारखान्याने दिल्यानंतर माझे दिरंगाईने माल पडुन राहील्याने अगर अन्य कारणाने नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी कारखान्याची राहणार नाही.हे माला मान्य आहे.

५. वरील खरेदी केलेल्या मालाची डिलेव्हरी आजपासुन टेंडर मुदतीत घेईन.ठरविलेल्या मुदतीत मी साखरेची डिलेव्हरी घेतेली नाही.व शर्तीप्रमाणे बयानाची रक्कम व मालाची किंमत भरली नाही तर सदर व्यवहार रद्द करण्याचे सर्व अधिकार कारखान्यास राहतील.अशाप्रसंगी माझे जोखमीवर बाजारभावाने अगर खाजगी रितीने अगर जाहीर लिलावाने नोटीस न देताही सर्व मालाची विक्री करावी व माल विकुन टाकावा.त्या विक्रीत कारखान्याचे होणारे नुकसानीची रक्कम मी भरुन देईन.

६. सौद्यापैकी काही माल मुदतीत मी उचलला व काही उचलावयाचा शिल्लक राहील्यास अशा शिल्लक राहिलेल्या मालाचा बाजारभावाने खाजगी रितीने अगर जाहीर लिलावाने विक्री शर्त न.५ मध्ये सांगितल्याप्रमाणे नोटिस न देताही करावी.कारखान्याचे होणारे अर्थिक नुकसान मी भरुन देईन.

७. शर्तीनुसार लिहिलेल्या मुदतीत माल न उचलल्यास व विक्री संमतीने कारखान्याने मुदत दिल्यास गोदामात पडुन राहीलेल्या मालाचे कारखाना जे गोडावुन भाडे ठरविल/आकारील ते भाडे मी भरुन देईन.

८ .सदर करारातील शर्ती व त्यांची पुर्तता या बाबत कारखाना व मी खरेदीदार यांचे दरम्यान काही मतभेद वाद निर्माण झाल्यास त्या वादाचा निर्णय मी महाराष्ट्र राज्य सहकारी सोसायटी च्या कायद्यातील तरतुदीस अनुसरुन करुन घेवुन त्या वादाचा जो निर्णय होईल तो आमचेवर बंधनकारक राहील व तो निर्णय अखेरचा समजण्यात येईल.

९. मी कारखान्याचे पोटनियमाप्रमाणे फी रु.१००/- भरुन नाममात्र सभासद झालो आहे.

१०.शुगर कंट्रोल ऑर्डर व तत्सम केंद्रिय व राज्य सरकारच्या कायदे व कानुनमधील वेळोवेळी अस्तित्वात असलेल्या व येना-या तरतुदीचे पालन करण्याची संपुर्ण जबाबदारी साखर खरेदीदार माझेवर राहील.

११.खुल्या बाजारात साखर विक्री करन्यासंबधी केंद्रीय व राज्य सरकारांनी वेळोवेळी रिलीझेस व तत्संबधीचे आदेशप्रमाणे कारखाना साखरेची विक्री करील या व्यवहारात साखर खरेदीदारास काही नुकसान सोसावे लागल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी माझेवर राहील.कारखान्यावर राहणार नाही.

१२ .सरकारी नियम (साखरे बाबतचे) पाळावे लागतील तसेच साखरेबाबत जे जे सरकारी हुकुम वेळोवेळी निघतील ते बंधनकारक राहतील.

१३. यासंबधी काही वाद निर्माण झाल्यास तो संगमनेर तालुका संगमनेर,जिल्हा अहमदनगर सहकार न्यायालयांतर्गत राहील.

१४. कारखान्याने सुरु केलेली ऑनलाईन साखर विक्री पध्द्त मला मान्य असुन, ऑनलाईन टेंडर भरणेसाठी मला कारखान्याकडुन मिळालेला पासवर्ड जपुन ठेवण्याची जबाबदारी माझी राहिल.

१५. वरिल करारातील शर्ती व अटी मी वाचल्या असुन त्या मला मान्य आहे.

करार लिहुन देणार | करार लिहुन घेणार

सही- | सही-

टेंडर भरणाराची सही | कार्यकारी संचालक